संपुर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे एकमेव मराठी वृत्तपत्र

# जागृत शोध

JAGRUT SHODHA

RNI.Reg.No.MAHMAR/2009/37305

संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा प्रतिनिधी व तालुक्यात तालुका प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ८००७०७२८२८

वर्ष १७ वे अंक २२ वा सोमवार दि २४ ते ३० जुलै २०२३ संपादक भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर मो ८००७०७२८२८ उपसंपादक राजेश जगताप

## ऊर्जा क्षेत्रात जर्मनीशी सहकार्य वाढवणार - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (प्रतिनिधी)- पर्यावरणपूरक आणि पर्यावरणसंवर्धक ऊर्जा ही काळाची गरज बनली असून या पार्श्वभूमीवर ऊर्जा आणि अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात जर्मनीशी सहकार्य वाढवणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जर्मन व्हाईस चान्सलर डॉ रॉबर्ट हॅबेक यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी उद्योग, व्यापार, आर्थिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील सहकार्य यासंदर्भात चर्चा झाली.

यावेळी जर्मनीचे राजदूत डॉ फिलिप अॅकरमन, कौन्सुल जनरल अॅकिम फॅबिग, राजशिष्टाचार विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, संचालक पी अन्बलगन, उद्योग विभागाचे विकास आयुक्त डॉ हर्षदीप कांबळे, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी तसेच २० जर्मन कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जर्मनीतील माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आणि जर्मनी यांच्यात ऊर्जा क्षेत्रात असलेले सहकार्य स्थैर्य देणारे ठरले आहे. पुण्यात मोठ्या प्रमाणावर जर्मन कंपन्या आहेत. अर्थव्यवस्थेला अधिक गती देण्यासाठी हे सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे. उद्योग आणि इतर क्षेत्रातही राज्य अग्रेसर आहे.

देश आणि राज्य झपाट्याने विकसित होत आहे. राज्याची अर्थव्यवस्था अधिक भक्कम करण्यासाठी रोड मॅप तयार करण्यात आला आहे. स्पीड ऑफ डेटा आणि स्पीड ऑफ ट्रॅव्हल यापुढील काळात महत्त्वाचे ठरणार असून या दोन्ही क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. तसेच स्टार्ट अप आणि युनिकॉर्न मध्येही महाराष्ट्र अग्रेसर आहे. ग्रीन हायड्रोजन पॉलिसी, सौर कृषी वाहिनी यासारखे नाविन्यपूर्ण प्रकल्प व धोरणे राज्यात राबविण्यात येत आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक पद्धतीवर सुरू असून चार्जिंग सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जर्मन व्हाईस चान्सलर डॉ. रॉबर्ट हॅबेक म्हणाले, उद्योग आणि आर्थिक क्षेत्रासह अनेक क्षेत्रांत सहकार्याच्या मोठ्या संधी आहेत. शैक्षणिक क्षेत्रातही दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणात आदानप्रदान होत असल्याचे डॉ. हॅबेक यांनी सांगितले.

## बांधकाम कामगारांना सुरक्षिततेची साधने पुरविण्याचे कामगार विभागाचे निर्देश

### महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणीचेही आवाहन

पुणे (प्रतिनिधी)- सध्या अतिवृष्टीचे दिवस पाहता बांधकाम व्यवसायिक, कंत्राटदारांनी बांधकामाच्या ठिकाणी दुर्घटना घडू नयेत यासाठी बांधकाम कामगारांना सुरक्षिततेची साधने व उपकरणे पुरवावीत, असे निर्देश कामगार विभागाने दिले आहेत. तसेच नोंदणी न केलेल्या बांधकाम कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी करुन घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

बांधकाम व्यवसायिक, कंत्राटदार व नियोक्ता यांनीदेखील स्वतःची नियोक्ता म्हणून https://lms.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईनरित्या नोंदणी करून घ्यावी. सुरक्षिततेची सर्व साधने व उपकरणे बांधकाम कामगारांना पुरवून कोणतीही दुर्घटना होणार नाही याची दक्षता घ्यावी. या दिवसात जमिन व संरक्षक भिंती खचणे आदी घटना घडण्याची शक्यता असल्यामुळे बांधकाम कामगार ज्या ठिकाणी रहातात ती जागा त्यामुळे बाधित होईल किंवा कसे याची खातरजमा करुन बांधकाम कामगारांना सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. बांधकाम कामगारांच्या आरोग्याच्यादृष्टीने सर्व सोयी-सुविधा त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी पुरवाव्यात.

सर्व बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या अनोंदीत बांधकाम कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणी करुन त्यांना मंडळामार्फत देय असलेल्या सुरक्षा संच, अत्यावश्यक संच, वैद्यकिय तपासणी व मध्यान्ह भोजन आदी योजनांचे लाभ मिळवून देण्यास बांधकाम व्यवसायिक, कंत्राटदार, व नियोक्ता यांनी सहकार्य करावे.

बांधकाम कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या बाबतीत निष्काळजीपणा आढळल्यास किंवा दुर्देवी अपघात होवून मनुष्यहानी झाल्यास, त्यास सर्वस्वी संबंधित बांधकाम व्यवसायिक, कंत्राटदार व नियोक्ता जबाबदार राहतील, असेही पुणे विभागाचे अपर कामगार आयुक्त शैलेंद्र पोळ यांनी कळविले आहे.

## शासन आपल्या दारी अभियानांतर्गत पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा



अहमदनगर (प्रतिनिधी)- शासन आपल्या दारी अभियानांतर्गत पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत यंत्रणांकडून आढावा घेतला.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री सालीमठ म्हणाले की, शासन आपल्या दारी अभियानांतर्गत जिल्ह्यात कार्यक्रमाचे नियोजन आहे. या अनुषंगाने सर्व यंत्रणांनी त्यांना देण्यात आलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी. कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात लाभार्थी तसेच नागरिक येणार असल्याने त्या पद्धतीने चोखपणे नियोजन करण्यात यावे. या कामात कुठल्याही प्रकारची हयगय होणार नाही यादृष्टीने आवश्यक ती काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीस सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## जलजीवन मध्ये नागरिकांना विश्वासात घेऊन कामे करा - महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील




शिर्डी (प्रतिनिधी) - जलजीवन मिशन अंतर्गत गावोगावी सुरु असलेल्या पाणी पुरवठा योजनांवर लोकांचा अधिकार आहे. या योजनेच्या कामाची पूर्तता करताना नागरिकांना विश्वासात घेऊन ग्राम स्थांच्या सूचनांप्रमाणे योजनेच्या आराखड्यात पुन्हा बदल करा. योजनेच्या यशस्वितेसाठी अधिकाऱ्यांनी सुध्दा जबाबदारीने काम करावे. केवळ ठेकेदारांवर विसंबून योजनेची अंमलबजावणी करु नका. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी अचानक भेटी देवून वस्तुस्थिती पहावी. अशा स्पष्ट सूचना राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे दिल्या.

राहाता, श्रीरामपूर, संगमनेर आणि राहुरी तालुक्यात सुरु असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या कामांचा आढावा महसूलमंत्री श्री.विखे पाटील यांनी आज घेतला. माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे अभियंता सोनवणे, सर्व विभागांचे प्रांताधिकारी, तहसीलदार आणि संस्थांचे पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

महसूलमंत्री श्री.विखे पाटील यांनी सर्वच तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांचा गावनिहाय आढावा घेतला. गावातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या योजनेच्या अंमलबजावणी बाबत असलेल्या तक्रारी तातडीने सोडवणूक करण्याबाबत त्यांनी प्रशासनाला सूचना केल्या. बहुतांशी गावांमध्ये ग्रामस्थाना विश्वासात न घेता योजनेचे काम सुरु असल्याच्या तक्रारी ग्राम स्थांनी केल्या हे अतिशय गंभीर आहे. ठेकेदारांच्या विश्वासावर योजनेची अंमबजावणी करू नका. अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

योजनेची अंमलबजावणी करताना अनेक गावांमध्ये ग्रामसभा झाल्या नाहीत, काही गावांमध्ये ग्रामसभेत केलेल्या ठरावानुसार योजनेत कोणताही अंतर्भाव झालेला नाही. त्यामध्ये बदल करुन, अधिकाऱ्यांनी पुन्हा ग्रामस्थांच्या मागणी नुसार या योजनांची आराखडे तयार करावेत. मागणी प्रमाणे योजनेचा वाढीव प्रस्ताव असेल तर पुन्हा मंजुरीसाठी पाठवा अशा सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

योजनेमध्ये वापरण्यात येणा-या पाईप बाबतही या बैठकीत तक्रारी करण्यात आल्या. एका ठरावीक कंपनीचेच पाईप वापरावे अशी सक्ती योजनेत कुठेही नाही असे स्पष्ट करुन, त्यांनी सांगितले की, योजनेच्या बाबतीत कुठलाही निर्णय करताना आधिकारी आणि कंत्राटदारांनी ग्राम स्थांना विश्वात घेवूनच करावा. सर्व योजनेच्या अंमलबजावणीसाठी पंचायत समिती आणि जीवन प्राधिकरणाच्या आधिका-यांनी एकत्रित समन्वय ठेवावा. या योजनेच्या यशस्वीतेसाठी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी कामे सुरु असलेल्या गावांमध्ये अचानक भेटी देवून कामांचा आढावा घ्यावा. अशा सूचनाही महसूलमंत्री श्री.विखे पाटील यांनी दिल्या आहेत

## पावसाळ्यात आपत्तीच्या परिस्थितीला तात्काळ प्रतिसाद देण्याची तयारी ठेवा

### पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे निर्देश

पुणे (प्रतिनिधी)- इरशाळवाडी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व दरड प्रवण गावांना भेटी देऊन तेथील परिस्थितीची माहिती घ्यावी आणि पावसाळ्यात कोणत्याही आपत्तीच्या परिस्थितीला तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा तयार ठेवावी, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

पालकमंत्री श्री.पाटील यांनी आज जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या तयारीबाबत आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांच्याशी चर्चा केली. त्यांनी जिल्ह्यातील पावसाची परिस्थिती, धरणातील पाण्याची स्थिती, दरड प्रवण आणि पूरप्रवण गावांची माहिती घेतली.

तालुका पातळीवर प्रत्येक आठवड्यात दरड प्रवण गावांना भेटी देण्यात याव्यात. या गावांमध्ये धोक्याच्या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना पावसाळ्यात सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावे. नागरिकांना आपत्तीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात यावी. दरडी पडण्याचा धोका असलेल्या भागात पावसाच्यावेळी वाहतुकीसाठी रस्ते बंद ठेवावेत. पर्यटनस्थळांच्या ठिकाणी कोणतीही दुर्घटना होणार नाही यादृष्टीने आवश्यक प्रतिबंध घालण्यात यावे. आपत्तीच्या वेळी प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक साधने आणि मनुष्यबळाचे नियोजन तयार ठेवावे. विशेषत: दरड प्रवण क्षेत्रात तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक यंत्रणा तयार ठेवावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांनी जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनाबाबत करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक घेण्यात येवून दरड प्रवण आणि पूरप्रवण गावांबाबत आढावा घेण्यात आला. तालुका स्तरावर पथके तयार करून दरड प्रवण गावातील परिस्थितीची माहिती घेण्यात आली. आपत्तीच्यावेळी नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी जवळची सुरक्षित निवाऱ्याची ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. दरड प्रवण गावांबाबत तालुका स्तरावरील नियंत्रण कक्षाद्वारे माहिती घेण्यात येत आहे. जिल्ह्यातील डोंगर उतारावरील वाड्या, वस्त्या आणि गावांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

## अनधिकृत ठरलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देणार नाही - मंत्री दीपक केसरकर

मुंबई, दि.२१ : राज्यात शिक्षण विभागामार्फत विविध शाळांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. यामध्ये खाजगी व्यवस्थापनाद्वारे ६६१ शाळा या अनधिकृतपणे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. या शाळांवर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असून या शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ दिले जाणार नाही, असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विधानसभेत सांगितले.

राज्यातील अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबतचा प्रश्न विधानसभा सदस्य सर्वश्री हरिभाऊ बागडे,आशिष शेलार, अतुल भातखळकर, रईस शेख, अबू आझमी, सुनील राणे, संजय केळकर, योगेश सागर, अशोक उईके, यामिनी जाधव यांनी उपस्थित केला होता.

मंत्री श्री. केसरकर म्हणाले की, या अनधिकृत शाळांमध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शाळांना कागदपत्राची तातडीने पूर्तता करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच मुंबईतील अनधिकृत शाळाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी सोबत बैठक घेऊन यावर विद्यार्थी हितासाठी सहनुभूतीपूर्वक निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री श्री केसरकर यांनी सांगितले.

या अनधिकृत शाळांमध्ये शासन मान्यतेनेविना शाळा सुरू करणे, राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाशी संलग्नतेकरिता आवश्यक असणारे शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेणे, संबंधित परीक्षा मंडळाचे संलग्नता प्रमाणपत्र न घेणे या बाबी निदर्शनास आल्याने संबंधित शाळांवर कारवाई करण्यात येत आहे. तसेच सन २०२२ मध्ये काही शाळांमध्ये शासनमान्यता आदेश हे बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे. या शाळांवर सुद्धा फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

जागृत शोध



# संपादकीय....

## पर्यावरण ‘व्यवस्थापन’

बारमाही, सर्वऋतुकालीन महामार्ग असे ज्यांचे वर्णन केले गेले होते, असे काही राष्ट्रीय महामार्ग हिमाचल प्रदेश, उत्तराखंडात पावसाने नेस्तनाबूत होतात, याचा अर्थ काय?

नैर्ऋत्य मोसमी वारे आणि अरबी समुद्रातून पश्चिमेकडून गेलेले वारे यांचा संगम हिमाचल प्रदेशावर झाल्याने त्या राज्यात ढगफुटीसारखा पाऊस पडला. हे कारण झाले. पण असे काही पहिल्यांदाच झाले असे नाही. बरोबर दहा वर्षांपूर्वी उत्तराखंड राज्यावर या दोन वात मोहिमांचा असाच संगम झाला आणि त्या राज्यास पावसाने न भूतो न भविष्यति असे झोडपले. म्हणजे या काळात असे होऊ शकते याचा अंदाज आपणास होता. तसा तो व्यक्तही करण्यात आला होता. पण तरीही व्हायचे ते झालेच आणि सत्तरएक जण प्राणास मुकले. दहा वर्षांपूर्वी उत्तराखंडाच्या देवभूमीत यापेक्षा अधिक जीवितहानी झाली होती आणि काही महत्त्वाच्या धर्मस्थळांचेही नुकसान झाले होते. या वेळी मुख्य तडाखा हिमाचलास बसला आणि देवभूमी तशी तुलनेने बचावली. नेहमीप्रमाणे या पावसातही दरडी कोसळल्या, लहानमोठ्या मोटारी वाहून गेल्या, वाहत्या पाण्याने वाहून आलेल्या मातीने जनजीवन लिंपून टाकले आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी दहा वर्षांपूर्वीची दृश्ये विद्यमान पूरचित्रांत बेमालूम मिसळून आपल्या वृत्तवाहिन्याही वाहत्या ठेवल्या. आता हेही नेहमीचेच झाले आहे. भीतीची भावना जागृत करणारे वृत्तांकन आणि त्यासमवेत आपण काहीच कसे धडे शिकत नाही वगैरे थातूरमातूर चर्चा आदींच्या साहाय्याने असे नैसर्गिक आपत्तींचे ‘इव्हेंट’ साजरे केले जातात. असेच होत असल्याने या माध्यम-गोंगाटात काही अत्यंत महत्त्वाच्या सत्याकडे दुर्लक्ष होते. ठरवून, सर्वास सोयीचे म्हणून असे होते किंवा काय आदी चर्चेत सहभागी होण्यापेक्षा या सत्याकडे लक्ष वेधणे अधिक महत्त्वाचे.



बारमाही, सर्वऋतुकालीन महामार्ग असे ज्यांचे वर्णन केले गेले होते, त्यांच्या विशेष उभारणीसाठी संबधितांचे कौतुक करण्यात आले होते आणि ज्यांचे उद्घाटनही मोठ्या डाम डौलात झाले असे काही राष्ट्रीय महामार्ग या पावसाने नेस्तनाबूत केले हे ते भयंकर सत्य. हिमाचल, उत्तराखंड, जम्मू-काश्मीर ही सीमावर्ती राज्ये. देशाच्या सुरक्षेत या राज्यांचे महत्त्व लक्षात घेता तेथील महामार्ग बांधणीकडे अलीकडे विशेष लक्ष दिले गेले. आणि या विशेष लक्ष देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांकडे जनसामान्यांचे लक्ष जाईल, अशीही व्यवस्था वारंवार केली गेली. पण या ताज्या पावसाने अगदी अलीकडे उभारलेले तीन महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग वाहून नेलेच पण कुलु-मनालीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या जुन्या महामार्गाचेही प्रचंड नुकसान केले. कुलु-मंडी आणि पारवानू-सिमला या महामार्गावरची वाहतूकही दरडी कोसळल्याने अथवा काही भाग वाहून गेल्याने बंद करावी लागली. किमान डझनभर पूल ताज्या पुरात होत्याचे नव्हते झाले. एकट्या हिमाचलात धुपल्या गेलेल्या रस्त्यांची संख्या ४०० इतकी प्रचंड आहे. अन्य राज्यांतील मिळून एकंदर ८०० रस्ते या पावसाने अपंग झाले. संरक्षण मोहिमेत अत्यंत महत्त्वाच्या गणल्या गेलेल्या एका बोगद्याच्या तोंडावरच दरड कोसळली. सिमला-चंडीगढ महामार्गाचीही हीच अवस्था. मनाली-लेह या राष्ट्रीय महामार्ग उभारणीचे अलीकडेच कोण कौतुक झाले. संरक्षणसिद्धतेसाठी आणि लष्कराच्या दळणवळणासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे आपणास सांगितले गेले. तो आहेही तसा. त्याचबरोबर अन्य काही महत्त्वाच्या महामार्गाप्रमाणे हा महामार्गही बारमाही, सर्वकालीन असेल असेही आपणास सांगितले गेले. सर्वकालीन याचा अर्थ उन्हाळा, बर्फाच्छादित हिवाळा आणि धुवांधार पावसाळा अशा सर्व ऋतूंतील आव्हानांस हे महामार्ग पुरून उरणे अपेक्षित. पण प्रत्यक्षात झाले भलतेच. या दोन दिवसांच्या पावसाने मनाली-लेह महामार्गानेही धीर सोडला आणि त्याचा मोठा भाग वाहून गेला. लाहोल, पंगी, लडाखचे खोरे या परिसराचा त्यामुळे संपर्क तुटला. लाहौल-स्पिती खोरे सर्वार्थाने महत्त्वाचे. त्यास जोडणारा ग्राम्फू-काझा महामार्गही या जलप्रपाताने थिजवून टाकला. पंडोह ते मंडी या राष्ट्रीय महामार्गाने खरे तर २४ जूनला दरड कोसळणे अनुभवलेले. तेव्हाही तो काही काळ बंद होता. आता पुन्हा हा मार्ग रोखला गेला आहे. या परिसरांतील रावी, बियास, सतलज, चिनाब अशा सर्वच नद्या दुथडी भरभरून वाहात आहेत आणि खाली राजधानी दिल्लीत यमुनेच्या जलपातळीस धोकादायकरीत्या फुगवत आहेत.

महापुरात असे काही होतेच; पण त्यातही या नुकसानीची दखल का घ्यायची? याचे कारण असे की हे बारमाही सर्वऋतुकालीन महामार्ग उभारताना अन्यांच्या तुलनेत विशेष काळजी घेण्यात आल्याचा दावा केंद्र सरकारतर्फे केला गेला. तो खरा असेलही. पण तो पुरेसा मात्र नाही; हे या पावसाने दाखवून दिले. विशेष काळजी याचा अर्थ हे महामार्ग बांधताना पूरपरिस्थितीत पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था केली गेली आणि या रस्त्यांना सांभाळणाऱ्या डोंगराळ भागातील दरडी कोसळणार नाहीत असे उपाय योजले गेले. असे सांगितले तरी गेले. तरीही हे दोन्ही अडथळे या बारमाही, सर्वऋतुकालीन रस्त्यांनी अनुभवले. तेव्हा इतकी खबरदारी घेऊनही हे घडले कसे हा आपल्याकडे नेहमीच पडणारा प्रश्न आताही विचारला गेला. त्याची सविस्तर उत्तरे सापडतील तेव्हा सापडतील. पण सध्या दिसते ते असे की या सर्व प्रकल्पांसाठी घाईघाईने देण्यात आलेले पर्यावरणीय परवाने हे यामागील एक कारण ठरावे. एखादा प्रकल्प सरकारला ‘हवाहवासा’ असेल, सत्ताधाऱ्यांच्या राजकीय शिरपेचात तुरा खोवणारा असेल तर त्यासाठी पर्यावरणीय मंजुऱ्यांचा ‘अडसर’ कसा दूर केला जातो, हे आपणास ज्ञात आहेच. त्यात असे प्रकल्प कोणा निवडणुकांच्या तोंडावर उद्घाटित केले जाणार असतील तर पर्यावरण वगैरे मुद्दे अगदीच गौण ठरतात. असे झाले की काय होते हे या पुराने झालेला हाहाकार दाखवून देतो. अशा वेळी या प्रकल्पांच्या पूर्ततेचे यश मिरवणारे राजकारणी मात्र सोयीस्कररीत्या गायब झालेले असतात. बारमाही सर्वऋतुकालीन महामार्गाच्या उभारणीतही असे झाल्याचे निष्पन्न झाल्यास आश्चर्य वाटणार नाही. या महामार्गाच्या आसपास झाडाझुडपांची जी पठारे होती ती या प्रकल्प उभारणीत गायब झाली. या अशा मोकळ्या जागा पाण्याच्या नैसर्गिक साठवण-टाक्या असतात. त्याच नाहीशा झाल्याने पाण्याचा निचरा होऊच शकत नाही. वास्तविक हिमाचल वा उत्तरेतील अनेक प्रदेश हे काही मुंबईप्रमाणे काँक्रीट जंगलांचे वा चहुबाजूंनी वेढले गेलेले नाहीत. तरीही अशा ठिकाणी पाण्याचा निचरा दिवसेंदिवस होऊ शकत नाही यातून आपण पर्यावरणाचे किती दीर्घ आणि व्यापक नुकसान केले आहे हे लक्षात येईल. अर्थात ते लक्षात येऊनही उपयोग काय म्हणा! जेथे पर्यावरणाचे सर्व नियम धाब्यावर बसवून कोणा आधुनिक बाबा- आयोजित कार्यक्रमात देशातील सर्वोच्च सत्ताधीशच हजेरी लावत असेल आणि सदर बाबा नुकसानभरपाईची संपूर्ण रक्कमदेखील न देण्याचा उद्दामपणा करू शकत असेल तर कोण कोणास पर्यावरणरक्षणाचे धडे देणार हा प्रश्नच!

श्रद्धाळूंचे आशीर्वाद मिळवण्यासाठी धर्मस्थळांस जोडणारे द्रुतगती मार्ग, धरणे, जलविद्युत प्रकल्प, बेछूट पर्यटकांसाठी हॉटेल उभारणी आणि या सर्वासाठी निर्लज्ज जंगलतोड होणार असेल आणि तरीही प्रकल्पांना पर्यावरण मंजुऱ्या मिळणार असतील तर हिमाचल, उत्तराखंड, उत्तर प्रदेश आदी ठिकाणीच काय पण सर्वत्रच हे असे नैसर्गिक आपत्तींचे हाहाकार होणारच. पर्यावरण हे आदराने रक्षण करावे असे उद्दिष्ट आहे. त्याऐवजी पर्यावरण परवाने ‘मॅनेज’ करणे हेच लक्ष्य असेल तर दुसरे काय होणार?

## ‘गृहनिर्माण संस्था मतदार नोंदणी अभियाना’चा शुभारंभ

# गृहनिर्माण संस्थांमध्ये १०० टक्के मतदार नोंदणीसाठी सदस्यांनी पुढे यावे-मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे

पुणे (प्रतिनिधी)- निवडणूक प्रक्रियेविषयी असणारी उदासीनता दूर करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यांनी सहकार्य करावे आणि पुणे जिल्हा मतदान प्रक्रिया व हक्कांबद्दल जागरूक आहे हे दाखवून द्यावे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कर्तव्यभावनेने सुटीच्या दिवशी आपल्याकडे मतदार नोंदणीसाठी येत असताना त्यांना प्रतिसाद देऊन १०० टक्के मतदार नोंदणी करून अभियान यशस्वी करावे, असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले.



हिंजवडी येथील ब्लू रिज गृहनिर्माण संस्था येथे जिल्ह्यातील गृहनिर्माण संस्थांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या मतदारांची १०० टक्के मतदार नोंदणी करण्यासाठी जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे आयोजित ‘गृहनिर्माण सोसायटी मतदार नोंदणी अभियाना’च्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे, उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे, तहसीलदार रणजित भोसले, ब्लू रिज गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन राजेंद्र कुमार, सचिव पांडुरंग पाटील आदी उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री.देशपांडे म्हणाले, देश जेव्हा प्रतिकूल परिस्थितीतून किंवा वेगळ्या स्थित्यंतरातून जात असताना मतदारांची भूमिका महत्त्वाची असते. लोकशाही प्रक्रियेत सर्वसमावेशकता आणि मतदारांचा सहभाग असल्यास लोकशाही यशस्वी ठरते. त्यासाठी म तदार याद्यांचे शुद्धीकरण आवश्यक आहे. देशाचे भवितव्य तरुणांच्या हातात असताना केवळ १३ टक्के युवा मतदारांची नोंदणी झाली आहे. हे चित्र बदलण्याची गरज आहे.

मतदारांनी निवडणूक आयोगाचे प आणि संकेतस्थळाचा वापर करून मतदार यादीतील नाव तपासून घ्यावे. २१ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाचा लाभ घेत नागरिकांनी या प्रक्रियेत सहभाग घ्यावा. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हा निवडणूक प्रक्रियेचा कणा आहे त्यांच्या प्रयत्नांना गृहनिम र्ण संस्थांच्या सदस्यांनी साथ द्यावी आणि राज्य व देशाला मार्गदर्शक काम पुणे जिल्ह्याने करून दाखवावे, असेही आवाहन त्यांनी केले.

भारतातील पहिली निवडणूक १९५२ मध्ये घेण्यात आली. त्यावेळी देशात ही लोकशाही पद्धत टिकणार नाही असे भाकीत करण्यात आले. मात्र हे खोटे ठरवत भारतीय नागरिकांनी एकत्रितपणे निवडणूक प्रक्रिया यशस्वी करून दाखवली. देशातील लोकशाही प्रक्रियेच्या यशस्वी प्रवासावर आधारित ५ भागांची निवडणूक प्रक्रियेचे यश सांगणारी मालिका लवकरच दूरचित्रवाणी वाहिनीवर प्रदर्शित करण्यात येणार आहे, असेही श्री.देशपांडे म्हणाले.

जिल्हाधिकारी डॉ.देशमुख म्हणाले, भारतीय लोकशाही बळकट करण्यात भारत निवडणूक आयोगाची भूमिका महत्त्वाची आहे. आयोगाने निवडणूक प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनेक सुधारणा केल्या आहेत. निवडणूक पारदर्शकपणे घेण्यासोबत आता सर्वसमावेशक मतदार यादी तयार करण्यावर तसेच निवडणुका मतदारांच्यादृष्टीने सुविधाजनक होतील यावर भर देण्यात येत आहे. मतदार याद्यांचे शुद्धीकरण करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्याच्या मतदार यादीत मोठ्या संख्येने युवा मतदारांना अद्याप नोंदणी करण्याची संधी आहे. निवडणूक प्रक्रियेत सुशिक्षित नागरिकांची भूमिका मार्गदर्शक असावी आणि त्यांनी मतदान प्रक्रियेत पुढाकार घेण्याची गरज आहे. त्यादृष्टीने मतदार नोंदणीकरिता नागरिकांना प्रोत्साहित करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

संस्थेचे सचिव श्री.पाटील यांनीही यावेळी विचार व्यक्त केले. प्रशासनाने मतदार नोंदणीसाठी घेतलेला पुढाकार स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.कचरे यांनी केले. मतदार नोंदणीसाठी ब्लु रिज सोसायटीने चांगले सहकार्य केल्याचे सांगून त्यांनी नागरिकांना म तदार नोंदणी करण्याचे आवाहन केले.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री.देशपांडे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात छायाचित्र मतदार ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले आणि मतदार नोंदणी अर्ज स्वीकारून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हाभरातील १ हजार १६८ गृहनिर्माण संस्थांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे.

## पर्वती, शिवाजीनगर विधानसभा

# मतदार संघात गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदार नोंदणी अभियान

पुणे (प्रतिनिधी)- मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत २१२ पर्वती विधानसभा मतदार संघ तसेच २०९ शिवाजीनगर विधानसभा मतदार संघाच्या कार्यक्षेत्रातील सर्व गृहनिर्माण संस्थांमध्ये शनिवार २२ व रविवार २३ जुलै रोजी विशेष मतदार नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त कार्यक्रम घोषित केला आहे. त्याअंतर्गत मतदार संघातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन पडताळणी करणार आहेत. त्यामध्ये ज्या मतदारांची नावे मतदार यादीम ध्ये समाविष्ट नाहीत त्यांची नावे नमुना क्रमांक ६ मध्ये भरुन घेणे, कायमस्वरुपी स्थलांतरीत व मयत झालेल्या मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यासाठी नमुना क्रमांक ७ तर मतदार यादी किंवा मतदार ओळखपत्रातील त्रुटी दुर करण्यासाठी नमुना क्रमांक ८ भरुन घेतला जाणार आहे.

मतदार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे: नमुना क्रमांक ६ भरण्यासाठी अर्हता दिनाकांला वय वर्षे १८ पूर्ण होत असावे. निवासाच्या पुराव्यासाठी आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, भारतीय पासपोर्ट किंवा राष्ट्रीयकृत बँकेचे पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत यापैकी एकाची आवश्यकता आहे. वयाच्या पुराव्यासाठी आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, भारतीय पासपोर्ट, शाळा सोडल्याचा दाखला किंवा पॅन कार्ड यापैकी एकाची आवश्यकता आहे. नजीकच्या काळातील एक रंगीत पासपोर्ट आकाराचे पांढऱ्या रंगाची पार्श्वभूमी (बॅकग्राऊंड) असलेले छायाचित्र, मतदार भाडेकरू असेल तर नोंदणीकृत भाडे करार आवश्यक आहे.

मतदार यादीतून नाव वगळणेबाबत नमुना क्रमांक ७ साठी- मयत म तदार असेल तर मयताचा दाखला, लग्न होऊन सासरी गेलेल्या महिला व इतर मतदार संघात कायमस्वरूपी वास्तव्यास गेले असल्यास त्याचा पुरावा आवश्यक आहे.

मतदार यादीतील दुरुस्त्यांबाबत नमुना क्रमांक ८ साठी आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, भारतीय पासपोर्ट, राष्ट्रीयकृत बँकेचे पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत यापैकी एक की ज्यामध्ये बदल करावयाचा उल्लेख असेल असे कागदपत्र, तर एकाच मतदार संघात निवासाचे वास्तव्य बदलले असल्यास नमुना क्रमांक ८ अ भरण्यासाठी आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, भारतीय पासपोर्ट, राष्ट्रीयकृत बँकेचे पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत यापैकी एक की ज्यामध्ये पत्ता बदल केल्याचा उल्लेख असेल अशा कागदपत्राची आवश्यकता आहे.

ज्या नवमतदारांना ऑनलाईन नावनोंदणी करावयाची असेल त्यांनी https://voters.eci.gov.ळप या वोटर्स सर्व्हिस पोर्टल व वोटर हेल्पलाईन प या माध्यमांचा वापर करुन नवीन नाव नोंदणी करावी. या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमात नागरिकांनी सहभाग घ्यावा आणि नवमतदारांनी नोंदणी करून घ्यावी, असे आवाहनही दोन्ही मतदार संघांच्या मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी केले आहे.

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने

# मोरगाव येथे २० हजारापेक्षा अधिक वृक्ष लागवडीचा शुभारंभ

पुणे (प्रतिनिधी)- ‘पर्यावरणाप्रती कृतज्ञता-वृक्षारोपण व संवर्धन’ या अभियानाअंतर्गत सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाच्यावतीने बारामती तालुक्यातील मोरगाव येथे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांच्या हस्ते २० हजारापेक्षा अधिक वृक्ष लागवडीचा शुभारंभ करण्यात आला.

सा. बां. (वैद्यकीय) उपविभाग बाराम तीच्यावतीने आयोजित कार्यक्रमाच्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहिर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूर्व विभागाचे कार्यकारी अभियंता अनिल ढेपे आदी उपस्थित होते.

श्री. चव्हाण म्हणाले, निसर्गाचे आपण देणे लागतो, निसर्गास आपण काहीतरी दिले पाहिजे या हेतूने रस्त्याच्या दोन्ही बाजूला आणि शासकीय इमारतींच्या परिसरात जागा उपलब्ध आहे, अशा ठिकाणी झाडे लावून त्यांचे जतन आणि संवर्धन करावे अशा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त सचिव मनिषा म्हैसकर यांनी दिल्या. त्यानुसार हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागातील सर्व अभियंते व कर्मचाऱ्यांनी किमान १० फूट उंचीचे २० हजारापेक्षा अधिक वृक्ष लागवड आणि संगोपन करण्याचा प्रादेशिक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मिळून संकल्प केला आहे. यामध्ये स्वदेशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करणे हा या वृक्षारोपण मोहिमेचा मुख्य हेतू आहे.



या मोहिमेअंतर्गत वृक्ष लागवडीसाठी १० ते १२ फूट उंचीच्या वैशिष्टपूर्ण झाडांची निवड आंध्र प्रदेशातील राजम ुंद्री येथील नर्सरीमधून करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने वड, पिंपळ, कडुलिंब, सोनचाफा, कदंब, बहावा, आंबा, मोहोगणी, कैलासपती आदी वृक्षांची लागवड करुन शाश्वत आणि हरित पर्यावरण करण्याचा संकल्प केला आहे. या ठिकाणी किमान ५ किलोमीटर लांबीम ध्ये, रस्त्याच्या दोन्ही बाजूला १० मीटर अंतरावर हे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रजातीच्या झाडाची एक वेगळी वातावरण निर्मिती व्हावी या अनुषंगाने ५०० मीटर पर्यंत एकाच प्रजातीच्या झाडांची लागवड करण्यात येईल, असेही श्री. चव्हाण म्हणाले.

श्री. चव्हाण यांनी यावेळी १ हजार झाडे देण्याचे जाहीर केले. अधीक्षक अभियंत्यांकडून प्रत्येकी ४००, कार्यकारी अभियंत्यांकडून प्रत्येकी २००, उपअभियंता प्रत्येकी ७५, शाखा अभियंता प्रत्येकी ४०, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक १० तर प्रशासकीय कर्मचाऱ्यांकडून इच्छेनुसार वृक्षारोपण करण्यात येईल व पुढील ३ वर्षे ती झाडे जगविण्यात येतील.

संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे एकमेव मराठी दुवप्त
जागृत शोध
JAGRUT SHODHA
RNI.Reg.No.MAHMAR/2009/37305



# युवा पर्यटन मंडळ स्थापन करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

पुणे (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाच्या निर्देशानुसार स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यातील सर्व मान्यता प्राप्त शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व विद्यालयामध्ये ७ वीपासून पुढील वर्गातील विद्यार्थ्यांसाठी युवा पर्यटन मंडळाची स्थापना करावयाची आहे. त्यासाठी प्रोत्साहन स्वरुपात 'प्रथम येईल त्यास प्राधान्य' या तत्वावर अनुदान देण्यात येणार असून शाळा, महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन पुणे पर्यटन संचालनालयाने केले आहे.

युवा पर्यटन मंडळ स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन स्वरुप अनुदान म्हणून सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षांत शाळांमध्ये स्थापन केलेल्या प्रत्येकी एका क्लबसाठी १० हजार रुपये तर महाविद्यालयांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या प्रत्येकी एका क्लबसाठी २५ हजार रुपये असे अनुदान 'प्रथम येईल त्यास प्राधान्य' या तत्त्वावर देण्यात येणार आहे.

देशातील, राज्यातील पर्यटन, समृद्ध वारसा व संस्कृती यांचे माहितीगार म्हणून जागतिक स्तरावर देशाची प्रसिद्धी करण्यासाठी व भारतीय पर्यटनाचे युवा राजदूत घडविण्यासाठी राज्यातील मान्यता प्राप्त शाळांमध्ये युवा पर्यटन मंडळाची स्थापना करावयाची आहे. यातून विद्यार्थी व तरुणांमध्ये संघभावना, व्यवस्थापन नेतृत्व आणि सेवा यासारखी महत्त्वाची कौशल्ये आत्मसात करण्याची वृत्ती तसेच शाश्वत व जबाबदार पर्यटनाची जाणीव जागृती निर्माण करण्यास सहाय्य होईल.

युवा पर्यटन मंडळाची स्थापना करण्याबाबत अधिक माहितीसाठी पर्यटन संचालनालय पुणे विभागीय कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक- ०२०-२९९००२८९ व भ्रमणध्वनी क्रमांक ८०८००३५१३४ वर तसेच केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाचे संकेतस्थळ https://tourism.gov.in/whats-new/yuva-tourism-club या संकेतस्थळावरुन माहिती घेण्यात यावी, असे आवाहन पर्यटन संचालनालय पुणे विभागीय सहायक संचालक सुप्रिया करमरकर-दातार यांनी केले आहे.

# उद्योजक विनोद पुंड यांचा महात्मा फुले पुरस्काराने गौरव

## फुले दाम्पत्यांचा विचारांचा समाजात प्रसार व्हावा-दशरथ कुळधरण



नगर (प्रतिनिधी)- उद्योजक विनोद पुंड यांनी नगर शहरात कारपेटचा व्यवसाय करत यशस्वी उद्योजक म्हणून चांगला नावलौकिक मिळविला आहे.माळी समाजातील युवकांना उद्योजक विनोद पुंड यांचे कार्य प्रेरणादायी आहे.समाजातील तरुणांनी उद्योजक व्हावे व उत्तम व्यवसाय करावा. म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी उद्योजकांना महात्मा फुले पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.फुले दाम्पत्यांचा विचारांचा समाजात प्रसार व्हावा.या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात येतो.असे प्रतिपादन पुणे येथील सावित्री शक्तिपीठ व माळी समाज प्रबोधनीचे संस्थापक अध्यक्ष दशरथ कुळधरण यांनी केले आहे .

पुणे येथील सावित्रीबाई फुले स्मारक येथे संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त सावित्री शक्तीपीठ व माळी समाज प्रबोधिनी तर्फे नगरचे उद्योजक विनोद पुंड यांना महात्मा फुले पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी सावित्री शक्तिपीठाचे संस्थापक दशरथ कुळधरण, सातारा येथील आमदार जयकुमार गोरे,श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याचे अध्यक्ष पांडुरंग राऊत,कार्याध्यक्ष विकास रासकर,सीए के.एस.माळी, सावित्री शक्ती पिठाच्या राज्याध्यक्षा अपूर्वा सोनार, डॉ.सुनिता शिंदे,अ.नगर सकल माळी समाज ट्रस्टचे बाळासाहेब भुजबळ,राजेंद्र पडोळे,कॅप्टन सुधीर पुंड,अनिल इवळे,मनोज गाडळकर,भाऊसाहेब कोल्हे, अमोल भांबरकर,चि.गणेश पुंड आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना म्हणून विनोद पुंड म्हणाले,समता भूमी मध्ये मला महात्मा फुले पुरस्कार देण्यात आला. हे मी माझे भाग्य समजतो.समाजाचे पाठबळ मिळाल्याने मी यशस्वी उद्योजक झालो आहे .

या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला.या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील माळी समाज कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## पुणे विभागाच्या सहा शाखांकडून महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा वर्धापन दिन साजरा

पुणे (प्रतिनिधी)- पुणे रिजन मधील वाघोली,पेरणे फाटा , सणसवाडी, शिरसवडी,केशवनगर आणि लोहगाव या सहा शाखांनी संयुक्तिकरित्या महाराष्ट्र ग्रामीण बैंकेचा १४ वां वर्धापन दिन हॉटेल सेफ्रोन हॉल येथे साजरा केला .सदरील कार्यक्रमास महाराष्ट्र ग्रामीण बैंक, पुणे क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय व्यवस्थापक माननीय गिरीश बेंद्रे यानी अध्यक्ष स्थान भूषविले.

या कार्यक्रमास CPC कार्यालय प्रमुख पाटील सर उपस्थित होते.उपस्थिताचे स्वागत केशवनगर शाखेच्या शाखा व्यवस्थापक किरपाने मॅडम यांनी केले. माननीय पाटील सर यांनी बँकेच्या कर्ज सुविधा विषय माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्तविक तसेच अध्यक्षीय भाषण करताना माननिय क्षेत्रीय व्यवस्थापक गिरीश बेंद्रे यानी बैंकेचा पूर्ण इतिहास व वाटचाल या बद्दल ग्राहकांना अवगत केले. या प्रसंगी १० ते १५ खातेदारांनी आपले मनोगत व्यक्त करताना बँकेच्या सेवेविषयी आनंद व्यक्त केला बेंद्रे यांनी सर्वांच्या सूचनांचे स्वागत व शंकांचे समाधान केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना गिरीश बेंद्रे यांनी सर्वसामान्यांच्या जीवनात ग्रामीण बँकेमुळे झालेल्या अमुलाग्र बदल त्याबद्दलची आपले अनुभव सर्वांसमोर ठेवले ,साथ विश्वासाची वाट विकासाची या युक्तीवर ठामपणे कार्य करीत असून मध्यमवर्गीयासाठी हक्काची बँक ठरत आहे तसेच भविष्यात ग्राहकांना चांगली सेवा देऊन बँक ३०,००० कोटिंचा टप्पा लवकरच गाठेल असा विश्वास व्यक्त करून आपले मनोगत संपवले. कार्यक्रमास ७०-८० ग्राहक उपस्थित होते. सूत्रसंचालन किरपाने मॅडम यांनी केले तसेच आभार प्रदर्शन श्री शितोळे साहेब यांनी केले सदरील कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सर्व सहा शाखेचे अधिकारी व कर्मचारी व डेली वेजेस यांनी खूप मेहनत घेतली.

## प्रमोद वाघमारे यांच्यावर प्राण घातक हल्लाप्रकरणी मातंग समाजाच्यावती मंगळवारी धरणे



नगर (प्रतिनिधी)- मातंग समाजाचे जेष्ठ नेते श्री प्रमोद गंगाधर वाघमारे त्यांच्या वरती झालेल्या प्राण घातक हल्लूयामध्ये एमआयडीसी पोलीस स्टेशन या ठिकाणी एफ आय आर दाखल झालेले आहे यामध्ये ३२४/३४ प्रमाणे गुन्हा दाखल झालेला असून हल्लेखोरावर्ती वाढीव कलम ३०७ प्रमाणे करून घेण्याबाबत शासकीय विश्रामगृह अहमदनगर या ठिकाणी सकल मातंग समाजाच्या वतीने बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये सर्वांचे विचार ऐकून मंगळवार दिनांक २५ /७/२०२३ रोजी अहमदनगर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय समोर सकल मातंग समाजाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार आहे तरी जास्तीत जास्त मातंग समाज बांधवांनी भगिनींनी सहभागी व्हावे या बैठकीमध्ये (ज्येष्ठ नेते नामदेव चांदणे (कायदे तज्ञ एडवोकेट महेश शिंदे (मेजर रावसाहेब काळे मानवता जन आंदोलन (अध्यक्ष) विजय पाथरे आधुनिक लहुजी सेना तालुकाध्यक्ष ) किरण भाऊ उमाप अण्णाभाऊ साठे फाउंडेशनचे (अध्यक्ष) बाळासाहेब मोरे दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष) संजय चांदणे अण्णाभाऊ साठे फाउंडेशन (उपाध्यक्ष) बाळासाहेब वाघमारे (समाजसेवक )नानाभाऊ जगताप (समाजसेवक )धीरज भाऊ ससाणे अनेक मान्यवर उपस्थित होते

# जनस्वराज यात्रेचे रिक्षा व टॅक्सी संघटनेकडून स्वागत




नगर(प्रतिनिधी)-अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनाच्या वतीने राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष,माजी मंत्री महादेव जानकर यांच्या जनस्वराज यात्रेचे नगरमध्ये आगमन झाल्यावर नेप्ती नाका येथे संघटनेचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन यांच्या हस्ते सत्कार करून यात्रेचे स्वागत करण्यात आले यावेळी वारकरी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष साहेबराव पाचरणे,आरपीआयचे तालुकाध्यक्ष अविनाश भोसले, रासपाचे शहर जिल्हाध्यक्ष चिमाजी खामकर, तालुका अध्यक्ष श्री वाघमोडे, उमेश साठे, राजेंद्र नन्नवरे विलास काराळे, गणेश आटोळे, राहुल बाचकर, अय्याज शेख आदी उपस्तित होते.

यावेळी बोलताना जानकर म्हणाले राष्ट्रीय समाज पक्षाने सध्या राज्यभर यात्रा सुरू केली असून, ही यात्रा काही कुणाला विरोध करण्यासाठी नसून जनतेच्या हितासाठी काढली असल्याचे सांगून ते म्हणाले शेतकऱ्यांच्या युवकांच्या सर्वसमान्यांच्या प्रश्नासाठी आम्ही राज्यातील सर्व लोकसभा मतदार संघात रथयात्रा काढली आहे पक्ष देशात आगामी लोकसभेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असून चार राज्यांमध्ये आमच्या पक्षाला मान्यता मिळत चालली आहे. काही राज्यांमध्ये विजय देखील मिळेल तर स्वतः महाराष्ट्र मधून निवडणूक लढणार असल्याचे त्यांनी सांगितले

# अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने विद्युत महावितरणांच्या अधीक्षक अभियंता यांना निवेदन

## शेतकऱ्यांसह १५ ऑगस्ट ला आमरण उपोषण करण्याचा इशारा



अहमदनगर (प्रतिनिधी)- नालेगाव व नेप्ती शिवारातील कल्याण रोड चौफुला ते निंबळक पुलापर्यंत रोड लगत अंदाजे ३ किलोमीटर अंतरासाठी शेतकऱ्यांना शेती कामासाठी विद्युत कनेक्शन जोडणीच्या मागणीसाठी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने विद्युत महावितरणाचे अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर यांना निवेदन देताना महिला जिल्हा अध्यक्षा सुरेखाताई सांगळे समवेत पश्चिम महाराष्ट्र युवक आघाडीचे सचिव दत्ताभाऊ वामन, रावसाहेब काळे, सुनील सकट, सुनील ठाकरे, महेश नल्ला, बाळासाहेब बेल्हेकर, भैया पठाण, विलास नंदी, बबू सय्यद, काशिनाथ रोहोकले, गणेश लांडे आदीसह शेतकरी उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की. नालेगाव व नेप्ती शिवारातील शेतकऱ्यांनी वरील संदर्भीय विषयानुसार वेळोवेळी निवेदन करूनही व प्रत्यक्ष भेट घेऊन ही मागणी केलेली आहे. तरी २ वर्ष ९ महिने होऊन देखील अद्याप पर्यंत कुठल्याही प्रकारचे उत्तर अथवा कामकाज झालेले दिसत नाही. प्रशासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतलेली नसून संबंधित विभागाने लवकरात लवकर शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्यात यावे अन्यथा १५ ऑगस्ट रोजी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांसह आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# शाळेत जाणाऱ्या मुलींची छेड काढणाऱ्या आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

राहुरी (प्रतिनिधी)- राहुरी तालुक्यातील एका नगरजवळील मोठ्या गावामध्ये शाळेत जाणाऱ्या येणाऱ्या विद्यार्थिनींना तू कुठे राहते तुझा मोबाईल नंबर काय असे विचारून छेड काढणाऱ्या टारगटांना जाब विचारण्यासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलींच्या चुलत्याला मारहाण करणाऱ्या आरोपीं चा अटकपूर्व जामीन अर्ज अहमदनगर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश सहारे मॅडम यांनी दिनांक २१ ७ २३ रोजीफेटाळला आहे

याबाबत सविस्तर वृत्त असे की अहमदनगर शहरापासून जवळ असणाऱ्या राहुरी तालुक्यातील एका मोठ्या गावामध्ये शाळेत जाणाऱ्या विद्यार्थिनींची अनेक गावातील टार्गेट मुले सातत्याने छेड काढत असत सदरील मुलींना शाळेत जाता येता तुमचा मोबाईल नंबर द्या कुठे राहता असे विचारून त्यांना लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करत असत सदरच्या दैनंदिन प्रकारास कंटाळून सदरील बाबीं अल्पवयीन मुलींनी आपल्या घरच्यांना सांगितल्यामुळे त्यांचा चुलता सदरील बाबत कोणती मुले आहेत हे पाहण्यासाठी त्या मुलींना घेऊन जाताना रस्त्यात एक मुलगा त्यातील असल्याचे अल्पवयीन मुलींनी दाखवला असता त्याला चुलत्याने जाब विचारल्यानंतर सदरील मुलाने इतर दहा ते बारा लोकांना बोलून घेऊन सदरील अल्पवयीन मुलीचा चुलत्यास जबर मारहाण केली त्यामुळे राहुरी पोलीस स्टेशन येथे भादवी ३२६ तसेच अन्य कलमा प्रमाणे



गुन्हा दाखल करण्यात आला दरम्यानच्या काळात सदरील गुन्हा अल्पवयीन मुलींच्या छेडछाडीतून घडला असल्यामुळे बालकांचे लैंगिक प्रतिबंधक कायद्याच्या अनुषंगानेतपास करण्यासाठी गावातील नागरिकांनी व मूळ फिर्यादी यांनी पोलीस अधीक्षक यांना भेटूनविनंती केली असता वाढीव कलम लावण्यात आले सदरील आरोपींनी त्यांना अटकपूर्व जामीन मिळावा एक आरोपी अटक झालेले आहे अशा कारणाखाली जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयामध्ये अर्ज दाखल केले सदरील अर्जास वस्तुस्थिती प्रमाणे मूळ फिर्यादीच्या वतीने ऍडव्होकेट गोरक्ष पालवे यांनीयुक्तिवाद करून सदरील प्रकरणाचे गांभीर्य न्यायालय सम ोर निर्दर्शनासआणून दिले सदरील गावात शाळेत जाणाऱ्या मुलींना शाळेत जाणे देखील टारगेट मुलांमुळे कसे मुश्किल झाले आहे याबाबतयाबाबत सर्व बाबी न्यायालयामध्ये युक्तीवादा दरम्यान निदर्शनास आणून दिल्या सदरील बाबींचा व सदर प्रकरणाचे गांभीर्य पुरावे व मारहाण झालेल्या फिर्यादीयांचे वैद्यकीय प्रमाणपत्र या सर्व बाबीचा विचार करून जिल्हा न्यायाधीश सहारे मॅडम यांनी आरोपींचे अटक पूर्व जामीन अर्ज फेटाळून लावले सदरील मूळ फिर्यादीच्या वतीने गोरक्ष पालवे राजेश खळेकर रोहित बुधवंत गुरविंदर पंजाबी सागर गरजे राहुल अंबरीतअंकिता सुद्रिक बाळकृष्ण गीते धनश्री खेतमाळीस यांनी काम पाहिले.

## सेवादिनाचे औचित्य, मुंबईत सफाई कामगारांचा सन्मान

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन




मुंबई (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राज्यभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, मुंबई उपनगरचे पालकमंत्री या नात्याने मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सुद्धा मुंबईतील विविध भागात आयोजित केल्या गेलेल्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

वरळी येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमास पालकमंत्री उपस्थित राहिले असून, यावेळी त्यांनी मुंबईच्या स्वच्छतेची काळजी घेणाऱ्या सफाई कामगारांचा सत्कार केला आणि नागरिकांसाठी छत्र्यांचे वाटप केले. तसेच धारावी येथे आयोजित केलेल्या सेवा सन्मान कार्यक्रमात उपस्थित राहून, पालकमंत्री महोदयांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार केला आणि नागरिकांना संबोधित केले. यावेळी भाजपचे विधान परिषद गटनेते प्रवीण दरेकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपाकडून होणारी समाजसेवा अधिक सक्षम व्हावी यासाठी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुंबईतील धारावी येथे भाजपाच्या नवीन कार्यलयाचे उद्घाटन करण्यात आले.

### गायक मुकेश यांच्या १०० व्या जयंतीच्या निमित्ताने....

भारतीय सांगिताला एक नवी ओळख प्रदान करणारे प्रसिद्ध गायक मुकेश यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त मलबार हिल, नेपेन सी रोड येथील मुकेश चौकाचा नामकरण समारंभ संपन्न झाला. आपल्या स्वरांनी कलेची सेवा करणाऱ्या या अद्भुत कलाकाराला या सोहळ्याच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण करतो, असे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमासाठी गायक मुकेश यांचे पुत्र नितीन मुकेश, पुतण्या आणि अभिनेता निल नितीन मुकेश व त्यांचा परिवार उपस्थित होता.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

## अतिवृष्टीने नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करा

मुंबई (प्रतिनिधी)- बुलढाणा, यवतमाळ आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यांमधील पिकांचे तातडीने पंचनामे करुन शासनाकडे लवकर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. अतिवृष्टीग्रस्त भागातील नागरिकांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर, जळगाव जामोद तसेच यवतमाळ, नांदेडसह अनेक जिल्ह्यांमध्ये काल झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागातील पिके पाण्याखाली गेले आहेत. शेतीचेदेखील मोठे नुकसान झाले आहे. जिल्हा प्रशासनाने या झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून शासनाकडे लवकर प्रस्ताव पाठविण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिव आणि मदत व पुनर्वसन विभाग तसेच मुसळधार पाऊस झालेल्या क्षेत्रातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली. पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालेल्या भागातील ग्रामस्थांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले असून त्यांना स्थानिक ग्रामस्थांच्या घरांच्या नुकसानीचेदेखील पंचनामे करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

अतिवृष्टीमुळे पूर आलेल्या गावांमधील ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असून त्यांची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे, त्याठिकाणी ग्रामस्थांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात याव्यात आणि आपत्तीकाळात जिल्हा प्रशासनाने दक्ष राहण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

# वजन, मापे, मानकांची पडताळणी करून घेण्याचे आवाहन

पुणे (प्रतिनिधी)-सामान्य ग्राहकांना अचूक वजन व मापाने वस्तू अथवा सेवा देण्याच्या दृष्टीने सर्व व्यापारी, औद्योगिक प्रतिष्ठान तसेच इतर वजने, मापे वापरकर्त्यांनी त्यांच्याकडील वजने, मापे व मानकांची पडताळणी व मुद्रांकन करून घ्यावे, असे आवाहन उप नियंत्रक वैध मापन शाखा पुणे यांनी केले आहे.

वैधमापन शास्त्र यंत्रणेमार्फत वजने, मापे व मानके यांची पडताळणी व मुद्रांकनाची कामे केली जातात. काही वजने वा मापे यांचे उपयोगकर्ते हे त्यांच्याकडील वजन व माप यांची पडताळणी व मुद्रांकन करून न घेता वापर करत असल्याचे यंत्रणेच्या निदर्शनास आले आहे. अशा उपयोगकर्त्यांची माहिती संकलित करण्याकरिता वजने व मापे यांची दुरुस्ती करणाऱ्या परवानाधारकांना प्राधिकार पत्रे देऊन विहित नमुन्याप्रमाणे सर्वेक्षण करण्याकरीता वैधमापन शास्त्र यंत्रणेने प्राधिकृत केले आहे.

वजने, मापे पडताळणी व मुद्रांकन न करता वापरात आहेत अशा उपयोगकर्त्यांनी जवळच्या वैधमापन शास्त्र यंत्रणेच्या कार्यालयामध्ये संपर्क करून, वजने मापे पडताळणी व मुद्रांकन करून घ्यावे. तसेच सर्वेक्षणाकरता प्राधिकार पत्र घेऊन येणाऱ्या परवानाधारकास सहकार्य करावे, असेही सह नियंत्रक वैध मापन शास्त्र यांनी कळविले आहे.


बॅकींग क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेसोबत काम करुन महिना ३० ते ४० हजार कमवा

महाकालेश्वर मल्टिसीटी निधी लिमिटेड

संपुर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात कस्टमर सर्व्हीस पॉईंट देणे आहेत.

महिला बचत गट प्रतिनिधी पाहिजेत.

- संपर्क -

मो. नं. ८००७०७२२८२८
९५४५८९१५१५

आमच्याकडे मिळणाऱ्या सुविधा

जीएसटी सुविधा सेंटर

पता- सेंटर हॉस्पिटलजवळ, एसटीस्टॅन्डच्या पाठीमागे, रेव्हन्यु कॉलनी, शिरुर

Get better returns after Starting Your Government Approved Business

with GST Suvidha Center Powered By Effizent Seele Pvt Ltd.







आधार कार्ड सर्विसेज

अब आधार कार्ड से जुडी सुविधाएँ पाएं अपनी नजदीकी जीएसटी सुविधा सेंटर्स पर

आधार कार्ड में नाम बदलने की सुविधा
आधार कार्ड में पता बदलने की सुविधा
आधार कार्ड में जन्म तिथि बदलने की सुविधा
आधार कार्ड में जेंडर बदलने की सुविधा
आधार कार्ड डाउनलोड
नए आधार कार्ड की स्टेटस
आधार कार्ड अपडेट स्टेटस
आधार सेंटर अपॉइंटमेंट

All GST related services
Loan Services
Udyog Aadhar
PAN Card
GST Registration
Travel and Booking
Partnership Registration
Accounting
Mudra Loan
Society Registration
Instant Loan
CMA Report
ITR
Profit and Loss Account
Balance Sheet
Digital Signature
FSSI Registration
Employee Registration
Life Insurance
Trademark
General Insurance
LLP Formation
E-way Bill Registration
NGO Registration
Company Registration
PAN and TAN
Shop Act License
PF and ESI Registration
Money Transfer
Networth Statement

MAKE A PASSPORT FROM GST SUVIDHA CENTER

EFFIZENT




जागृत शोध हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर यांनी शिवकृपा प्रिंटर्स माळीवाडा अहमदनगर येथे छापुन, नगर- कल्याण रोड भावनाऋषी अहमदनगर ४१४००१ येथे प्रकाशित केले. संपादक- भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर मो. नं. ८००७०७२८२८, कार्यालय-कुंभार आळी, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे ४१२२१० jagrutshodha@gmail.com